P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - २७/०४/२०२३

**दि.२६/०४/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी ११३/ २०२३ भा.द.वि क ३०७,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०४/२०२३ रोजी दुपारी १२.०० ते १८.०० वा चे दरम्यान बनकरवस्ती, प्रमोद शेडगे यांची रुम, चिंबळी ता. खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/४/२०२३ रोंजी १७.५९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) समीर लतीफ पठाण (पती) वय २८ वर्षे रा. टाकळी मिया ता. राहुरी जि. अहमदनगर,२) महिला आरोपी **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते घरी त्यांचे पती आरोपी १ व त्यांची प्रियसी महिला आरोपी पुर्ण नाव पत्ता माहित नाही या दोघांना एकत्र राहता यावे म्हणून आरोपी १ याने,आपण हिला मारून टाकल्याशिवाय आपल्या दोघांना एकत्र राहता येणार नाही आपण हिला संपवून टाकू असे म्हणून त्या दोघांनी संगनमताने फिर्यादी यांचे पाय दोरीने बांधुन व आरोपी २ हिने दोन्ही हात जोरात पकडुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने आरोपी १ याने चाकूने फिर्यादी यांचे गळयावर वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि गुन्हे पाटील सो ९८५०५७६७८९ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी ४७६/२०२३,भादवि कलम ३०७,५०४,५०६ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),४(२७)प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०४/२३ रोजी २०.३० वा. सुमा. झुलेलाल मंदिरा जवळ पिंपरी मार्केट पिंपरी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०४/२०२३ रोजी १६.५८ वा |
| फिर्यादी | :- | प्रविण राजु शिरठाणे व य २२ वर्षे धंदा हमाली रा. आंबेडकर कॉलनी रिव्हर रोड पिंपरी पुणे |
| आरोपी | :- | एक अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे नाव पत्ता माहीत नाही. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पायी चालत त्यांची आई हीस पिंपरी मार्केट मध्ये भेटायला जात असताना झुलेलाल मंदिर पिंपरी मार्केट येथे एक कुत्रा फिर्यादी यांच्यावर अंगावर धावुन आल्याने फिर्यादी त्या कुत्र्यास शिवीगाळ करत असताना तेथे उभा असलेला आरोपी यास फिर्यादी त्यास शिवीगाळ करत आहे असा गैरसमज होवुन त्याने फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ करुन दमदाटी केली तो फिर्यादी सोबत भांडु लागला सदर भांडणात आरोपी याने त्याच्या जवळील लोखंडी कोयता फिर्यादी यास जीवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे डोक्याच्या मागील बाजुस मारला फिर्यादी यांच्या डोक्यातुन रक्तस्त्राव होवु लागला असता आरोपी यांने फिर्यादी यांस पुन्हा फिर्यादी यांच्या डोक्यात लोखंडी कोयत्याने वार करत असता फिर्यादी यांनी दोन्ही हात डोक्यावर घेतले असता त्याने फिर्यादी यांचे डोक्यात केलेले एक वार फिर्यादी यांचे उजव्या हाताचे तळव्यावर व दुसरा डावे हाताचे अंगठ्यावर लागला त्यामुळे फिर्यादी यांचे दोन्ही हातावर जखम होवुन डावे हाताचे |

अंगठ्याचे बोट कट झालेले असुन ते लटकत आहे तरी सदर आरोपीने फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी कोयत्याने फिर्यादी यांच्या डोक्यात वांरवारं वार करुन फिर्यादीस जबर जखमी केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि डोंगरे ७९७२६२५८५५

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चिंचवड १८७ /२०२३ भा.दं.वि.कलम ३५४,३२३,५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०४/२०२३ रोजी २१/३० वा सुमारास दगडोबा चौक, चिंचवडेनगर, पुणे. येथे

गुन्हा दाखल :- दि.२६/०४/२०२३ रोजी ००/३४ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- स्वप्नील रविंद्र शेळके वयः- २४ वर्षे राः- सचिनदादाचिंचवडे चाळ, चिंचवडेनगर, चिंचवड, पुणे.
**आरोपी अटक आहे.**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीची बहिन असे बाहेर गेल्या असतांना दगडोबा चौकाजवळ, नागरिकाचे गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीचे ओळखीचा आरोपी याने फिर्यादीचे कबरेला धरुन जवळ ओढुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न केली तसेच फिर्यादीचे बहिनीस व फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउनि व्हरकटे ९९२११३७६४७

४.

पोस्टे व गु.रजि.नं. :- सांगवी १९८/२०२३ भा.द.वि.कलम ३२६,सह भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),(३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०४/२०२३ रोजी १८.०० वा.सुमारास नंदनवन सोसायटी,पिपळे निलख,पुणे २७.येथे बाहेरील रस्त्याच्या फुटपाथवर

गुन्हा दाखल :- दि.२६/०४/२०२३ रोजी ००/३१ वा.

फिर्यादी :- श्री अमोल सुभाष कामठे वय ४२ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. ५०७,श्रावी एम्पायर ,विनायकनगर,पिंपळे निलख,पुणे २७

आरोपी :- युवराज बलराम अग्रवाल,वय २३ वर्षे, धंदा-बेकार, रा.आनंद नगर,शिक्षकसोसायटी,जुनी सांगवी,पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे आरोपी याने कामासाठी फोन करुन बोलावले म्हणुन गेले असता फिर्यादी यांनी आरोपीस विचारले कोठे काम करावयाचे आहे याबाबत विचारले असता आरोपीहा फिर्यादी यांना म्हणाला कि, तुम्ही माझ्या आईला सारखे सारखे कॉल का करता व पैसे का मागता असे बोलु लागला.तेव्हा फिर्यादी आरोपीस बोलले कि,तुझ्या आईने माझ्याकडुन आठ महिन्यापुर्वी एक लाख रुपये हातउसने म्हणुन घेतले होते ते पैसे परत मिळण्यासाठी मी कॉल केला होता.त्यावेळी आरोपी यास राग आल्याने त्याने नंदनवन सोसायटीचे कंपाऊड वॉल वरती ठेवलेला लोखंडी धारधार कोयता काढुन फिर्यादी यांचे डावे मांडीवर घाव घातला त्यानंतर फिर्यादी यांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न करुन तो दुसरा घाव घालत असताना त्याचा हात पकडुन ठेवला व मदतीसाठी आरडा ओरडा केला तेव्हा त्याठिकाणी रस्त्याने जात असणारे फिर्यादी यांचे ओळखीचे संजय बेंद्रे हे त्यांचे मदतीला आले व त्यानंतर फिर्यादी यांचा भाऊ महेश कामठे सदर ठिकाणी आला तेव्हा महेश कामठे याने आरोपी यास बाजुला केले व संजय बेंद्रे याने फिर्यादी यांना ॲपल हॉस्पीटल,विशालनगर येथे आणुन ॲडमिट केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउनि वरुडे ९८५०६९३३३०

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी १८४ /२०२३ भा.दं.वि. कलम २७९,३०४(अ),मोटार वाहन कायदाकलम १८४,११९ /१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०४/२०२३ रोजी ११.१५ वा सुमारास दिघी चौपाटी समोर, दत्तनगर बस स्टॉपचे पुढे, आळंदी कडुन पुणेकडे जाणारे रोड वरती,आळंदी पुणे रोड, दत्तनगर,दिघी,पुणे या ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०४/२०२३ रोजी १८.३३ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | श्री. ज्ञानेश्वर अर्जुन सुर्यवंशी वय ३७ वर्षे धंदा बसचालक, रा. ठि. कमलाकर वाघ यांची रुम,कोल्हेवाडी,खडकवसला ,पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील महानगर परिवहन महामंडळ लि.यांचे स्वारगेट बस डेपोच्या बस क्रमांक एमएच १२ आरएन ७०९२ ही हयगयीने व अविचाराने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी यांची मानलेली आई नामे श्रीमती शांताबाई शिवराम सालपे वय ७७ वर्षे ही रस्ता ओलंडत असतांना तिला धडक दिल्यान ेती बसचे चाकाखली चिरडले गेली त्यामुळे तिचे मृत्युस नमुद आरोपी हा कारणीभुत झाले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिंखरे ८७८८१८१७१४ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४१२/२०२३ भा.द.वि.कलम- ३७०(२) अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २६/०४/२०२३ रोजी १८/३५ सुमा. The Bella Spa & body massage, शॉप नंबर १२, बि-१, मिरा क्लासिक बिल्डींग,संतोषनगर, थेरगांव, ता. मुळशी जि. पुणे येथील प्लायवुड मध्ये बनवलेल्या रुम नं २ मध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०४/२०२३ रोजी २३.५६ वा |
| फिर्यादी | :- | सोनाली विलास माने वय २७ वर्षे मपोशि २५६९ नेमणूक- अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्ष पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | १) मनोज भुजंग माने वय ३४ वर्षे सध्या. रा. शॉप नंबर १२, सी विंग, मिरा क्लासिक बिल्डींग, थेरगांव पुणे. रा. मुळपत्ता मु. बोरवटी पो. महापुर ता. लातुर जि. लातुर आधार नंबर ७४८२ १००८ ७०८७ मो.नं. ९५४५८२६५८३ (स्पा चालक मालक)<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने स्पा सेंटरचे नावाखाली पिडीत महिलेस पैशांचे अमिष दाखवून स्पा मसाज सेंटरचे नावाखाली प्राप्त करून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन तिचेकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि लोहार ९८५०२२३१९० |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत १९५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०४/२०२३ रोजी ११.३० ते २०.०० वा दरम्यान पुनावळे गावचे हददीतील पुनेव्हिले सोसायटी मधील फ्लॅट नं १००२ मध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०४/२०२३ रोजी ०२.३२ वा |
| फिर्यादी | :- | विदयुत भवरसि अरोरा वय ४८ वर्षे धंदा नोकरी रा पुनेव्हिले सोसायटी फ्लॅट नं ए १००२ पुनावळे ता मुळशी जि पुणे |
| आरोपी | :- | १) रामेश्वर पंजाबराव देशमुख वय २४ वर्षे रा सुर्यमुखी गणेश मंदिराचे पाठीमागे श्लोक हाईट फ्लॅट नं १०१ म्हाळुगे ता मुळशी जि पुणे २)उत्कर्षे संघपाल दुधमल वय १९ वर्षे रा महादेव मंदिरा शेजारी म्हाळुंगे ता मुळशी जि पुणे व तीन विधीसंघर्षित बालक **आरोपी क्र १ व २ अटक आहेत,** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी फिर्यादीचे फ्लॅटची साफसफाई करत असताना फिर्यादीचे कपाटामध्ये ठेवलेल्या पाकीट मधुन ,वहि मध्ये ठेवलेले घरखर्चासाठी व फिर्यादीचे आईचे पर्स मधील ३८,१००/- रुपये रोख व फिर्यादीचे कपाटामधील सॅमसंग कंपनीचा गॅलेक्सी ई ५ मॅडेलचा मोबाईल फोन किं ३०००/- असे एकुण ४१,१००/- रु किं चा माल फिर्यादीचे संमती शिवाय लबाडीचे इरादयाने चोरी केला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा ४२५ कोळगे ९९२१०३०८८८ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड २६६/२०२३ भा.द.वि.कलम ४०६ ४२० ३४ आय टी ॲक्ट ६६ क |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०४/१२/२०२२रोजी १४.४८ वा. पासून ते दि. १७/०३/२०२३ Kayra https://web.telegram.org/k/#@kayraaa1310, ttps://web.telegram.org/k/#806470944,www.moviestart.net/login या वेबसाइट |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०४/२०२३ रोजी २३.३९ वा |
| फिर्यादी | :- | सुनिलकुमार दिनेशकुमार यादव वय-३६ वर्ष धंदानोकरी रा सर्व्हे नं २०/४/१ थॅामसकॉलनी मामुर्डी देहुरोडता.हवेली जि.पुणे |
| आरोपी | :- | कायरा संजना विक्रम आणि कस्टमर केअर वरील अनोळखी इसम **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी आपआपसात संगनमत करून फिर्यादीला त्याचे टेलीग्राम अकाउंट वर Kayrahttps://web.telegram. org/k/# @kayraaa1310,https://web.telegram.org/k/#806470944, www.moviestart.net/login: या वेबसाइट वरुन फिर्यादीला मेसेज पाठवुन मुव्हीचा रिव्हुटास्क देण्याच्या व सुरवातीस बक्षीस देवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीचे बँक खात्यातुन वेळोवेळी किंमत ३५,३१,००६.८९/- रू स्वताचे वेगवेगळया अकाउंटवर घेउन संदेशवहन साधनाचा वापर करुन तोतयागिरीने फिर्यादीची फसवनुक करुन नमुद रकमेचा अपहार केला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि गुन्हे सुर्यवंशी सो ९४२२९३९०७७ |